REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 15 | ISSUE - 11 | AUGUST - 2026

# “जैन महिलांची सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक स्थिती : एक अध्ययन “

प्रिती संदीपराव सहारकर
संशोधन केंद्र, गुलाम नबी आझाद समाजकार्य महाविद्यालय, पुसद, जिल्हा यवतमाळ.
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, संलाग्नीत

## सारांश (Abstract)



भारताचा सामाजिक अभ्यास , सामाजिक रचना आणि व्यवस्थेवर अवलंबून आहे. या प्रमाणे प्राचीन आणि वर्तमान युगामध्ये भारतीय महिलांच्या वास्तविक रूपाचे मुल्यांकन त्या त्या युगाप्रमाणे महिलां विषयी प्रचलित दृष्टीकोणाला समजूनच केले जाऊ शकते. जैन धर्मामध्ये प्राचीन काळापासून महिलांना उच्च स्थान देण्यात आलेले आहे. जैन धर्मामध्ये महिलांच्या शिक्षणाला संमिलीत करण्याकरिता खूप कष्ट घेतले गेले आहेत. धार्मिक ग्रंथ आणि समाज त्यांना शिक्षणाचा हक़्क़ बहाल करतो याचे प्रमाणशीर संदर्भ उपलब्ध आहेत. त्यामुळे जैन महिला हि आर्थिक आणि शैक्षणिक पातळीवर तसेच जैन धर्मात महिलांना दुय्यम स्थान न देता त्यांना धर्म आणि दानाच्या क्षेत्रात सक्षम बनवण्याचे समर्थन करतो. प्रस्तुत शोध निबंधामध्ये जैन महिलांचा ऐतिहासिक काळापासून ते आजच्या २१ व्या शतकापर्यंत सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेण्यात आला आहे.

**महत्वाचे शब्द (Keywords) :** जैन धर्म, महिला , सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक.

## प्रस्तावना (Introduction)

जग फार वेगाने बदलत आहे आणि हा बदल वेगवेगळया दिशांनी होत आहे. भारतीय जैन महिलांचे कार्यक्षेत्र कुटुंब होते आणि महिला नेहमी कुटुंबाला सुखी आणि संपन्न बनवण्याचा प्रयत्न करत होती . ज्या महिला शिक्षण घेऊन विकासाच्या जवळ उभ्या आहेत त्या आता घराबाहेर निघून विकसित जगात संमिलीत होत आहेत. बदलत्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीत महिलांना शिक्षण आणि रोजगाराचे साधन सुलभरीत्या मिळत आहे, त्यामुळे त्यांना स्वातंत्र्य मिळत आहे.

समाजात स्वतः प्रतिष्ठा मिळवण्याचे साधन मिळाल्यामुळे आपल्या तर्हेने जीवन जगण्याची संधी आणि स्वातंत्र्य प्राप्त झाले आहे. जैन धर्म हा भारतातील एक प्रमुख आणि प्राचीन धर्म असून त्याची परंपरा आजता गायत विवध भागात चालू आहे. धर्म परंपरेचे हे सातत्य सतत अविरतपणे शतकानुशतुनतके चालू राहण्याचे कारण म्हणजे धर्माने दिलेली एकात्मतेची शिकवणूक मुख्यत: कारणीभूत आहे. जैन हा धर्म अनादी अनंत असून जैन संस्कृती हे त्याचे मूळ आहे. जैन संस्कृती अहिंसा, सत्य, ब्रम्हचर्य, समता, इत्यादी महान तत्वांवर अवलंबून आहे. भारतीय संस्कृतीत जैन संस्कृती महान वरदान ठरली आहे. त्यामुळे जैन धर्माची व्यापकता, प्राचीनता आणि स्वरूप हे विश्व व्यापक आहे. आज जैन समाज हा अल्पसंख्याक असला तरी बहुसंख्य लोकांच्या सामाजिक जीवनाशी तो एकरूप झालेला आहे.

भारतीय संस्कृती समृध्द होण्यासाठी जैनांनी फार महत्वपूर्ण कार्य केलेले आहे. विविध विषयावर अनेक भाषांमधून मौलिक व विपुल ग्रंथरचना करून ठेवली आहे. जैन धर्माप्रमाणे (इ.स.पु. 6 वे पर्यंत) विचार केल्यास जैन धर्माच्या मूळ तत्वानुसार स्त्री आणि पुरुषांना समान मानले गेले. त्यामुळे स्त्रियांना त्या काळी समानतेचा दर्जा होता. जैन धर्मात स्त्रीला मोक्ष प्राप्तीचा अधिकार आहे. ती शिक्षण आणि आध्यात्मिक मार्गावर पुरूषांइतकीच समान मानली जाते. भगवान ऋषभनाथांनी स्त्रियांना चौसष्ट कला शिकविल्या होत्या. पहिले तीर्थंकर ऋषभनाथ यांनी त्यांच्या मुलींना (ब्राम्ही आणि सुंदरी) भाषा आणि कलांचे शिक्षण दिले. त्यावेळेस स्त्रियांच्या शिक्षणाला महत्व मिळाले. त्याच प्रमाणे भगवान ऋषभ देवांनी भारत, बाहुबली आदी पुत्रांना अर्थशात्र, नृत्यकला, चित्रकला, गृहनिर्माण कला, आयुर्वेद, धनुर्वेद इत्यादी लोकांच्या जीवनाला आवश्यक अशी शास्त्रे व कला यांचे शिक्षण दिले. मनुष्य जीवनात विद्येचे महत्व जाणून स्त्रियांना व पुरुष्यांना विद्या संपादन करण्यास वृषभ देवांनी सांगितले. आचार्य जिनसेन यांच्या 'आदिपुरण' ग्रंथात विद्येची महती आपल्या दोन्ही मुलींना सांगताना भगवान वृषभदेव म्हणतात मानवाचा बंधू आणि मित्र असणारी विद्या हे शेवट पर्यंत बरोबर राहणारे धन असून विद्येमुळे सर्व हेतू साध्य होतात. म्हणून हे मुलींनो, तुम्ही दोघीही विद्याग्रहण करण्याचा प्रयत्न करा.

जैन महिलांची सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक प्रगतीचा अभ्यास होणे फार गरजेचे आहे. या अभ्यासाच्या माध्यमातून महिलांना त्यांच्या अडचणी जाणून त्यावरील उपाययोजना शोधता येईल. या अभ्यासामुळे इतर धर्मीय महिलांना जैन महिलां प्रमाणे साक्षर आणि आर्थिक स्वावलंबी होण्यासाठी प्रेरणा मिळेल. त्यामुळे सदरील विषयावर संशोधन होणे आवश्यक आहे.

## समस्येचे विधान (Statement of the Problem)

'शिकलेली बाई घर पुढे नेई' या म्हणी प्रमाणे जर महिला साक्षर आणि आर्थिक स्वावलंबी झाल्या तर तिच्या घराची आणि सोबतच देशाची प्रगती होईल. भारतातील इतर धर्मीय स्त्रियांच्या तुलनेत जैन महिलांचा साक्षरता दर नेहमी उच्च राहिला आहे. राष्ट्रीय पातळीवर हा दर कौतुकास्पद असला तरी उच्च शिक्षण, व्यावसायिक शिक्षण आणि नौकरी, त्यांचे स्थान यामध्ये प्रादेशिक व सामाजिक पातळीवर काय बदल घडून आलेत या बाबत आढावा घेणे गरजेचे आहे .

प्रस्तुत शोध निबंध जैन महिलांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक वाटचालीचे टप्पे, त्यांना मिळणाऱ्या संधी, आणि त्यांच्या समोरील आव्हाने स्पष्ट करण्यास मदत करेल. यापूर्वी अश्या पद्धतीच्या अध्ययनाचे संदर्भ फार कमी प्रमाणात उपलब्ध आहेत असे दिसून येते.

## संशोधनाची उद्दिष्टे (Research Objectives)

(१) जैन महिलांच्या ऐतिहासिक आणि समकालीन स्थितीचा अभ्यास करणे.
(२) जैन महिलांच्या सामाजिक स्थिती मधील बदलांचा अभ्यास करणे.
(३) जैन महिलांच्या शैक्षणिक स्तराचा अभ्यास करणे.
(४) जैन महिलांचे आर्थिक क्षेत्रातील स्थान अभ्यासणे.

## संशोधन पद्धती (Research Methodology)

प्रस्तुत संशोधन लेख संपूर्णपणे दुय्यम पद्धतीवर आधारित आहे. यासाठी शासकीय अहवाल, भारताची जनगणना, शोध पत्रिका, शोधनिबंध, शोधप्रबंध, नियतकालिके, पुस्तके, वर्तमानपत्रे, विविध लेख, इत्यादी चा वापर करून तयार करण्यात आलेला आहे.

## साहित्याचे पुनरावलोकन (Review of Literature)

सामाजिक इतिहास हा सामाजिक विज्ञानाचा मूलस्त्रोत आहे. कोणत्याही राष्ट्राची उन्नती त्या देशातील स्त्रियांच्या स्थितीवरून निर्धारित होत असते. वस्तुतः भारतीय स्त्रियांची स्थिती प्रत्येक युगात बदलत आली आहे. वस्तुतः समाजाच्या रचनेमध्ये स्त्री आणि पुरुष दोन्ही समाजाचे प्रमुख घटक आहेत आणि दोन्ही मिळून एक समाज व्यवस्था बनते. त्यापैकी कोणत्याही एकास महत्व देणारा समाज हा समाजाच्या यतार्थ कल्याणाशी सुसंगत होऊ शकत नाही. ऐतिहासिक काळात विश्वाला आणि मानव जातीला नवीन प्रेरणा देऊन गतिमान बनविण्याचे कार्य स्त्रीने केल्याची साक्ष इतिहासाची असंख्य पाने देत आहेत.

## शास्त्री, पंडित कैलासचंद्र यांच्या मते, स्त्री शिक्षण व्यवस्था :

प्राचीन काळी जैनांनी स्त्री शिक्षणाकडे विशेष लक्ष दिले आहे. इतर धर्माच्या मानाने जैन स्त्रीला सर्व ज्ञान घेऊन उन्नतीची संधी दिली जात होती आणि त्या प्रकारची सोय उपलब्ध होती. परंतु. त्यामानाने हिंदू स्त्रियांना धार्मिक क्षेत्रात जरा खालचे स्थान देण्यात आले होते आणि त्यांना वेदाभ्यास करण्याची परवानगी नव्हती. बौद्ध संघात स्त्रियांना प्रवेश देण्यास गौतम बुद्धांचा प्रथम विरोध होता परंतु नंतर सर्व दर्ज्यांच्या स्त्रियांना संघात प्रवेश मिळाला. जैनांनी चालविलेल्या विद्यालयांमधून मुलींना शिक्षिकांच्या देखरेखेखाली लौकिक व धार्मिक शिक्षण देण्यात येत असे. अनेक विद्वान स्त्रियांनी स्वतःला या पवित्र कार्यासाठी वाहून घेतलेले होते. वयोमानानुसार मुलींना भाषा, कला, विज्ञान, शरीर संगोपन व युद्ध शास्त्र इत्यादी विषयांचे शिक्षण देण्यात येत असे. मुलांच्या बरोबरीने मुलींना शिक्षण देण्यात येत असे व दोघांच्या शिक्षणक्रमात भेद केला जात नसे. इतकेच नव्हे तर विशेष शिकलेल्या व प्राविण्य दाखविणाऱ्या स्त्रियांना कुटुंबात, समाजात, संघात व राजदरबारी मानाचे स्थान मिळत असे.

## स्त्री शिक्षणाची अवनती :

समतावादी, सयंमशील जीवन दृष्टीचा अंगीकार जैन शिक्षण प्रणालीने केल्यामुळे इ. पु. काळात भगवान महावीर व भगवान पार्श्वनाथ तीर्थंकरांच्या आधीपासून सुशिक्षित, सुवीध, सुसंस्कृत लोकांनी गणतंत्र राज्य पद्धती सुरु केली नि किमान इ.स. पु. १००० - १५०० वर्ष अस्तित्वात होती. भारतात मुस्लीम सत्ता स्थिर झाल्यानंतर इसवी सनाच्या चौदाव्या शतकापासून जैनांच्या शैक्षणिक कार्याची अवनती सुरु झाली. भारतीय जीवन सुखी, समृद्ध व संपन्न करण्याचे कार्य जैन प्रणालीने केले. भगवान महावीरांनी स्त्रियांना संघात स्थान दिले. त्यामुळे स्त्रीचा दर्जा हा उंचावलेला दिसून येतो. महावीरांनी स्त्री पुरुष संबंधात संघ व साधुता यांना मनाचे स्थान राहावे यासाठी स्त्री पुरुष संबंधाला फार जपले. यामुळे जैन संघातील साधू व साध्वीचे जीवन जास्तीत जास्त पवित्र व निर्मल बनले. अडीच हजार वर्षे हि परंपरा स्वच्छ रीतीने अखंडपणे चालू राहिली. हजारो प्रकारच्या परकीय आक्रमणातही जैन साधू, साध्वी टिकून राहिल्या. यांचे श्रेय सर्व साधू व साध्वीच्या व्रत पालनालाच आहे. मुसलमानी सत्ता भारताच्या पुष्कळ भागावर स्थापन झाल्यानंतर जैन संस्थांना विविध राज्यांचा सदैव भरघोस पाठींबा नष्ट झाला, जैन संस्थांवर हल्ले झालेत, ग्रंथसंपदा नष्ट झाली, जैन आचार्यांना विहार करणे कठीण झाले, गुरुकुल संस्था नष्ट झाल्या व यामुळे स्त्रीस्वातंत्र्यावर मोठा आघात झाल्याकारणाने व बालविवाहाची प्रथा रूढ झाल्याने स्त्रीशिक्षण कार्य जवळ जवळ बंद पडले.

## पुनर्जागरण :

**मिलिंदकुमार खेळकर (२०२६)** यांच्या नुसार जैन धर्माने प्राचीन काळापासून भारताच्या बौद्धिक, सामाजिक आणि सांस्कृतिक नवजागरणात अतुलनीय योगदान दिले आहे. पाश्चिमात्य, इंग्रज व अन्य परकीय राज्यकर्त्यांचे सैन्य व शस्त्र शक्ती, नवीन नवीन शस्त्रांचा शोध, औद्योगीकरण, आधुनिक विचार इत्यादीमुळे भारतातील काही पुढारी आणि समाजसेवकांना हजारो वर्षाच्या गुलामगिरीची जाणीव झाली. स्त्री हक़्क़ा विषयी जागृती होऊ लागली. या विचारांचा परिपाक म्हणजे स्त्रियांच्या बाबतचे निर्बंध हळूहळू सैल होत गेले आणि स्त्री शिक्षणाचा आणि राजकारणातील त्यांच्या सहभागाचा पुरस्कार केला गेला. यामुळे सावित्रीबाई फुले आणि फातिमा या शिक्षण घेऊ शकल्या. भारतीय स्वातंत्र्यानंतर जैन समाजातील स्त्रियांच्या पुनर्जागारणाचा प्रवास उच्च शिक्षण, आर्थिक स्वावलंबन आणि धार्मिक-सामाजिक नेतृत्व या तीन प्रमुख स्तंभांवर आधारित राहिला आहे. पारंपारिक चौकटीतून बाहेर पडत आजच्या जैन महिलांनी व्यावसायिक, शैक्षणिक आणि सार्वजनिक जीवनात अत्यंत प्रभावी कामगिरी केली आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील पुनर्जागरणाची प्रमुख उद्दिष्टे खालील प्रमाणे आहेत, (अ) जैन समाजातील स्त्री साक्षरतेचे प्रमाण अत्यंत उच्च राहिले असून आधुनिक काळात उच्च शिक्षण घेणाऱ्या महिलांचे प्रमाण लक्षणीय आहे. (ब) केवळ गृहिणी न राहता जैन स्त्रिया आता सामाजिक महिला उद्योजक बनल्या आहे आणि आर्थिक निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढला असून कौटुंबिक संपत्तीत आणि व्यवसायातही त्यांचे स्थान निर्माण झाले आहे. (क) आजच्या जैन स्त्रियांमध्ये आपल्या राजकीय आणि मुलभूत हक़्क़ानबद्दल मोठी जागृतता निर्माण झाली आहे. (ड) जैन महिला कुटुंब व्यवस्थेला टिकवून

ठेवन्यासोबतच अहिंसा आणि जीवदया या जैन तत्वांचा प्रसार नवीन पिढीत करण्यात महत्वाची भूमिका बजावत आहे.

### प्रतिभा पार्श्वनाथ आणि डॉ. रामचंद्र के. (२०१७) यांच्या मते,

सद्यस्थितीत विविध महिला व्यक्तिमत्वांनी स्वत: ला धार्मिक क्रियाकलाप आणि सामाजिक सेवामध्ये समर्पित केले आहे. अशा थोर व्यक्तिमत्व म्हणजे दिवंगत मातृश्री रत्नम्मा हेगडे या होत्या. त्यांना "अभिनव कलालदेवी" म्हटले जाई. त्या भारतीय जैन समाजकार्याच्या मुख्य कना होत्या. याचप्रमाणे महाराष्ट्रातील जैन महिलांच्या शैक्षणिक आणि सामाजिक उन्नतीचा इतिहास दिवंगत पद्मश्री डॉ. सुमतीबाई शहा यांच्याशिवाय अपूर्ण आहे. दानशूर अत्तीमब्बे आणि राणी मानसिजे यांनी ऐतिहासिक काळात केलेले कार्य हे आजच्या काळातील 'जीतो' JITO अंतर्गत सुरु आहे.

### कास्पोस यांचा, 'इन्कम इफेक्ट' सिद्धांतानुसार,

श्रीमंत कुटुंबामध्ये घरातील महिलांनी बाहेर काम न करणे आणि घरातच राहणे हे कौटुंबिक प्रतिष्ठेचे लक्षण मानले जाते. पुरुषांची कमाई कुटुंबाला सुखी जीवन देण्यासाठी पुरेशी असल्याने, जैन महिला अनेकदा पैसे न मिळणाऱ्या घरगुती किंवा धार्मिक कामामध्ये स्वतःला गुंतवून घेतात. सिमोन द बोहा यांच्या सिद्धांतानुसार, 'पती जेवढा जास्त श्रीमंत असतो, तेवढे त्याचे पत्नीवरील आर्थिक आणि सामाजिक नियंत्रण अधिक मजबूत असते'. यामुळे कुटुंबातील पुरुष अधिक हुकुमशाही पद्धतीने वागतो.

### वाल्बी एस. १९९०, यांच्या मते,

पितृसत्ता हि एक गतिमान व्यवस्था आहे. २१ व्या शतकातील जैन महिला आजही सार्वजनिक क्षेत्रातील पितृसत्ताक व्यवस्थेच्या बंधना मध्ये अडकलेली आहे. महिलांना आता सार्वजनिक क्षेत्रात (शिक्षण, नौकरी आणि समाज) प्रवेश करण्यापासून रोकले जात नाही, परंतु त्यांच्या प्रवेशावर नियंत्रण ठेवले जाते आणि निर्बंध लादले जातात, आणि त्यांच्यावर वर्चस्व गाजवले जाते.

### जैन स्त्री साक्षारता

२०११ च्या जनगणनेनुसार, जैन धर्म हा ऐकून लोकसंख्येच्या केवळ ०.३७% इतकी असून जैन धर्म हा प्रगट आणि धार्मिक अल्प समुदाय आहे .

**इतर धर्माच्या तूलनेत जैन स्त्री साक्षरता दर्शविणारा तक्ता.**

| धर्माचे नाव | एकूण साक्षरता दर | पुरुष साक्षरता दर | स्त्री साक्षरता दर |
|---|---|---|---|
| हिंदू | ६५.१ | ७६.२ | ५३.२ |
| मुस्लिम | ५९.१ | ६७.६ | ५०.१ |
| ख्रिचन | ८०.३ | ८४.४ | ७६.२ |
| शिख | ६९.४ | ७५.२ | ६३.१ |
| बौद्ध | ७२.७ | ८३.१ | ६१.७ |
| जैन | ९४.१ | ९७.४ | ९०.६ |
| इतर धर्म | ४७.० | ६०.८ | ३३.२ |
| एकूण | ६४.८ | ७५.३ | ५३.७ |

(संदर्भ : जनगणना २०११)

वरील तक्त्यावरून असे निदर्शनास येते कि  जैन धर्म हा भारतातील सर्वाधिक साक्षर समाज आहे. इतर धर्मियांच्या समुदायाच्या तुलनेत जैन महिलांचा साक्षरता दर देशात सर्वोच्च आहे. स्त्री आणि पुरुष साक्षरतेमधील तफावत देखील जैन धर्मामध्ये सर्वात कमी आहे, जी केवळ ६.८% इतकी आहे. मुस्लिम आणि हिंदू महिलांपैकी साधारण निम्मे घटक हे निरक्षर आहेत. जरी जैन महिलांचा साक्षरता दर अधिक असला तरी त्यांना येणाऱ्या अडचणीमधून त्यांनी कसा मार्ग काढला हे बघणे देखील गरजेचे आहे.

## जैन महिलांची सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक स्थिती :

जैन महिलांची सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक स्थिती हि भारतातील अनेक इतर समाजांच्या तुलनेत सामान्यत: अधिक चांगली मानली जाते. जैन महिलांची सामजिक ,शैक्षणिक आणि आर्थिक स्थिती याचे सविस्तर स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे सांगता येईल.

### १. सामाजिक स्थिती :

जैन धर्मात अहिंसा ,समानता, सत्य आणि नैतिकमूल्यांना महत्व दिले जाते. त्यामुळे महिलांना कुटुंबात आदराचे स्थान मिळते. जैन महिला धार्मिक कार्य, समाजसेवा आणि सांस्कृतिक उपक्रमामध्ये सक्रियपणे सहभागी होतात. अनेक जैन कुटुंबामध्ये महिलांना करियर आणि वैयक्तिक निर्णय घेण्याचे स्वातंत्र दिले जाते. तरीही काही पारंपारिक कुटुंबामध्ये विवाह, कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि सामाजिक अपेक्षांमुळे महिलांवर काही मर्यादा दिसून येतात.

### २. शैक्षणिक स्थिती :

जैन धर्मात शिक्षणाला अत्यंत महत्व दिले जाते. जैन महिलांमध्ये साक्षरतेचे प्रमाण तुलनेने जास्त आहे. त्या अभियांत्रिकी, वैद्यकीय, व्यवस्थापन, वाणिज्य, कायदा, शिक्षण आणि संशोधन

अशा विविध क्षेत्रात उच्च शिक्षण घेत आहेत. अनेक महिला देश-विदेशातील प्रतिष्टीत संस्थांमध्ये शिक्षण घेऊन विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करीत आहेत.

**३. आर्थिक स्थिती** :

जैन धर्म हा परंपरेने व्यापार, उद्योग आणि व्यवसायाशी संबंधित असल्यामुळे अनेक जैन महिलांची आर्थिक स्थिती चांगली असते. त्या कुटुंबीय व्यवसाय, उद्योजकता, बँकिंग, शिक्षण, आरोग्य सेवा, माहिती तंत्रज्ञान आणि इतर व्यावसायिक क्षेत्रात कार्यरत आहेत. अनेक जैन महिला स्वतःचे उद्योग सुरु करून रोजगार निर्मितीतही योगदान देत आहेत. तथापि काही ठिकाणी महिलांचा व्यवसायातील सहभाग मर्यादित असतो, तसेच आर्थिक निर्णयामध्ये पुरुषांचे वर्चस्व दिसून येते.

थोडक्यात सांगायचे झाल्यास, जैन महिलांचे सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक स्थिती एकंदरीत सक्षम आणि प्रगत मानली जाते. शिक्षण, आर्थिक स्वावलंबन आणि सामाजिक सहभागामुळे त्यांचे स्थान बळकट झाले आहे. तरीही समाजातील बदलत्या परिस्थितीनुसार महिला नेतृत्व, निर्णयप्रक्रियेतील आर्थिक सहभाग आणि संधीची समानता यांवर पुढे ही भर देणे आवश्यक आहे.

## चर्चा आणि विश्लेषण (Discussion and Analysis)

प्रस्तुत शोधनिबंधाच्या उद्दिष्टांच्या अनुषंगाने केलेल्या साहित्याचे आणि निष्कर्षाचे विश्लेषण खालीलप्रमाणे आहे,

(१) जैन परंपरेमध्ये ऐतिहासिक काळापासून महिलांना आध्यात्मिक क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने स्थान दिले गेलेले आहे. आधुनिक काळात कडक सामाजिक बंधने शिथिल होताना दिसत आहेत. ऐतिहासिक काळातील केवळ धार्मिक स्वातंत्र्य आता आधुनिक काळात नागरी स्वातंत्र्यात बदलले आहे, परंतु आध्यात्मिक क्षेत्रातील त्यांचे सर्वोच्च स्थान सामाजिक निर्णय प्रक्रियेत पूर्णपणे दिसून येत नाही.

(२) सार्वजनिक पितृसत्तेचा उदय कंन्दीयोती आणि वाल्बी यांच्या सिद्धांतानुसार जैन महिलांची सामाजिक स्थिती आता खासगी पितृसत्तेकडून सार्वजनिक पितृसत्तेकडे सरकली आहे. आधुनिक जैन महिलांना आता शिक्षणासाठी आणि घराबाहेर पडण्यापासून थेट रोकले जात नसून त्यांचा सामाजिक क्षेत्रातील वावर आणि स्वातंत्र्य हे अद्यापही कौटुंबिक चौकटी द्वारे नियंत्रित केले जाते. वाल्बी यांच्या मते पितृसत्ता हि एक गतिमान व्यवस्था आहे. जैन महिलांनी जुन्या सामाजिक बंधनावर मात केली असली तरी नव्या सार्वजनिक रुपात त्या अजूनही मुख्य कौटुंबिक आणि सामाजिक निर्णय प्रणालीत अजूनही दुय्यम स्थानावर आहेत.

(३) जैन महिलांचा साक्षरता दर सर्वोच्च आहे. समाजकार्य दृष्टीकोनातून विचार केल्यास शिक्षणाचा मूळ हेतू व्यक्तीला स्वावलंबी बनवणे हा असतो. परंतु जैन महिला या अनेकदा उच्च शिक्षणाचा उपयोग प्रत्यक्ष करियर घडविण्यापेक्षा कौटुंबिक प्रतिष्टा वाढवतांनी दिसतात.

(४) जैन समुदाय हा देशातील श्रीमंत समुदायापैकी एक आहे. काप्सोस यांच्या इन्कम इफेक्ट या सिधान्तानुसार, आर्थिक स्थिती उत्तम असल्यामुळे महिलांना कमावण्याची सक्ती नसते. त्यामुळे त्या नोकरी ऐवजी बिनपगारी घरगुती तसेच धार्मिक कार्यात स्वतःला गुंतवून घेतात. बोव्हा यांच्या सिद्धातानुसार पती जेवढा श्रीमंत तेवढे महिलांचे आर्थिक परावलंबित्व वाढते. एकंदरीत महिला या शिक्षित तसेच आर्थिक दृष्ट्या पात्र असून करियरच्या संधी जरी महिलांना उपलब्ध असल्या तरी त्यांचे एक प्रकारचे  मानसिक खच्चीकरण होत असल्याचे दिसते.

जैन महिलांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक विकासासाठी समाजकार्याच्या सहा पद्धती परस्परपूरक आहेत. वैयक्तिक समाजकार्यामुळे महिलांच्या वैयक्तिक समस्या सुटतात. गट कार्यामुळे नेतृत्व व सहकार्य वाढते. समुदाय संघटनामुळे सामाजिक सहभाग वाढतो. समाजकल्याण प्रशासनामुळे योजना प्रभाविपणे राबविल्या जातात. सामाजिक कृतीमुळे समान हक्कांसाठी वातावरण तयार होते. तर समाजकार्य संशोधनामुळे भविष्यातील विकासासाठी वैज्ञानिक आणि परिणाम कारक धोरणे तयार करता येतात. या सर्व पद्धतींच्या एकत्रित वापरातून जैन महिलांचे सर्वांगीण सक्षमीकरण आणि शाश्वत विकास साध्य होऊ शकतो.

## निष्कर्ष (Conclusion)

जैन धर्मामध्ये महिला शिक्षणाचे स्थान हे संपन्नतेकडे नेणारे आहे, जी सामाजिक आणि धार्मिक दृष्टीकोनातून समृद्धीचा आधार आहे. जैन साहित्य हे संदर्भासहित असे सांगते कि महिलांना शिक्षण घेण्याचे पूर्ण हक्क आहेत. आजच्या महिला ह्या या गुणामध्ये पूर्णपणे निपुण असून त्या पुरुषांच्या खांद्याला खांदा लाऊन प्रत्येक क्षेत्रात मार्गस्थ होत आहेत. प्रस्तुत शोध निबंधात, असा निष्कर्ष येतो को जैन समाजातील महिला या शैक्षणिक क्षेत्रात इतर धर्मियांच्या तुलनेत अग्रेसर आहेत. परंतु फक्त उच्च साक्षरता दर असणे म्हणजे पूर्ण समानता झाली असे म्हणणे अयोग्य आहे, जोपर्यंत जैन महिलांना कौटुंबिक आर्थिक सत्ता आणि वैयक्तिक निर्णय प्रक्रियेत पूर्ण अधिकार मिळत नाही तोपर्यंत हे सक्षमीकरण अपूर्ण आहे. महिला आर्थिक दृष्ट्या सक्षम होण्याकरिता समाज कार्यकर्त्यांनी जनजागृती करणे आणि समुपदेशन करणे गरजेचे आहे. तसेच महिलांना आर्थिक दृष्ट्या सक्षम होण्या करिता त्यांना संधी उपलब्ध  करून दिली पाहिजे.

## संदर्भ सूची  (References)

1. आवटे, ज. स. २०२५. मराठी जैन कथेतील स्त्री प्रतिमा. International Journal for Multidisciplinary Research, ०७(०४), पृ.क्र. १-५.
2. बिजेकर, र. २०२५. शिक्षणनामा. नवशक्ती.
3. भुसारी, सु. प्र. २०१२. शोधप्रबंध: भगवान महावीर यांच्या शैक्षणिक विचारांचे व कार्यांचे चिकित्सक परीक्षण. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर, पृ.क्र. ३०६-३३७.
4. Beauvoir, S. De. 1949. The Second Sex. Paris : Gallimard.

5. धनागरे, द. ना. २००२. उद्दातीकरणाकडून सक्षमीकरणाकडे : स्त्री-शक्ती आणि आजचे सामाजिक वास्तव. नवभारत, ५५(०९), पृ.क्र. १-१६.
6. गवळी, एस. वाय. आणि गांगुर्डे, वाय. ए. २०२५. जैन स्त्री संघ पद्धती. Journal of East West Thought, १५ (१), पृ. क्र.७२४-७२८.
7. जैन, अ. आणि शर्मा, सं. २०२५. Iinternational Journal of Education, Modern Management, Applied Science & Social Science, ७(०१[II]), पृ.क्र.१५९-१६२.
8. जैन, से. आणि भारतीय, ने. २०२५. Woman in Jainism : Exploring the position of Jain laywomen with reference to patriarchal framework. International Research Journal of Multidiciplinary Scope, ६(२), पृ. क्र. ६९९-७०९.
9. Kandiyoti, D. 1988. Barganing with Patriarchy. Gender and Society, 2(3), pp 274-290, [IRJMS Journal].
10. Kapsos, S. 2008. The Gender Employment Gap in India : International Labour Organization (ILO) [IRJMS Journal].
11. खेळकर, मि. २०२६. पारंपारिक भारतीय ध्यान प्रणालीमध्ये महिलांचा दर्जा व भूमिका. Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ), XIV, १(१), पृ. क्र. २०७-२०१२.
12. पार्श्वनाथ, प्र. आणि रामचंद्र, क. २०१७. Socio-economic status of Woman in Jainism: Then and now. International Journal of Humanities and Social Sciences, ३(९), पृ.क्र. १०-१४.
13. सविस्तर ऐतिहासिक विवेचनाचे परीलुप्त असा मननीयलेख (jainworld,jainworld.com/JWMarathi/library/….)
14. सिंह, नि. २०१२. भारतीय महिलाए एक सामाजिक अध्ययन : (०६) भारत मे कामकाजी महिलाए. ओमेगा पब्लिकेशन्स, न्यू दिल्ली-, पृ. क्र. ८१.
15. तातेड, क. रा. २०१९. जैन संस्कृति के परिप्रेकश्य में भारतीय नारी. हर्षवर्धन पब्लिकेशन, प्रा. ली., लीम्बागणेश, बीड.
16. वालचाळे, अ. प्र. २०१२. मराठी जैन साहित्य स्वरूप आणि आकलन (१९००-२०००). पैठणी प्रकाशन, औरंगाबाद.
17. Walby, S. 1990. Theorizing Patriarchy. Oxford: Basil Blackwell (IRJMS Journal).